जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

टोकरतलाव रोड, नंदुरबार ता.जि. नंदुरबार

दुरध्वनी क्रमांक : ०२५६४–२१०१५१ ईमेल आयडी : **mahdhunansc@aij.gov.in**

म.जा.क्र.(रो.व वि.)३०९३ /२०२५ दिनांक : ०६/१२/२०२५

निविदा

प्रति,

_____

_____

_____

विषय :– Kyocera Ecosys M2040dn लेझर प्रिंटरसाठी २० नग Genuine/ Original कार्टेज खरेदी करणेबाबतची निविदा सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयांस अनुसरून व मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. नंदुरबार यांचे आदेशान्वये कळविण्यात येते की, म.जिल्हा व सत्र न्यायालय नंदुरबार करिता **Kyocera Ecosys M2040dn लेझर प्रिंटरसाठी २० नग रिफिलींग करता येईल असे Genuine/Original कार्टेजची आवश्यकता आहे.**

त्याकरिता नोंदणीकृत विक्रेत्याकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी आपण सदर निविदा म.जिल्हा न्यायालय, नंदुरबार टोकरतलाव रोड, नंदुरबार या पत्यावर सिलबंद पाकीटात **दिनांक** 12/12/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी **सायं. ५.००** वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

सर्वसाधारण अटी

१. निविदेतील **कार्टेजचा** दर्जा उत्कृष्ट व उच्च प्रतीचा **Genuine/Original** असावा अन्यथा सदरचे **कार्टेज** आपणांस परत करण्यात येतील व **कार्टेज** हे नव्याने तात्काळ बदलून पुनश्च पुरवावे लागेल व त्याचे कुठलेही अतिरिक्त देयक दिले जाणार नाही. **तसेच सदर कार्टेज रिफिलींग करता येण्याजोगे असावे.**

२. सदरील **कार्टेज** पुरविल्यानंतर संबंधीत विभाग प्रमुखचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदर **कार्टेज** देयक सहा.अधिक्षक, रोख व वित्त विभाग यांचेमार्फत पारीत केले जाईल.

३. सदरील **कार्टेज** नंदुरबार जिल्हा न्यायालयात पोच करून देण्याची जबाबदारी विक्रेत्यावर राहील.

४. देयकाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर विक्रेत्यास CT-GST पावती देणे बंधनकारक राहील.

५. उपरोक्त पुरवठा सदरील कार्यालयात स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे आदेशपत्र मिळाल्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या ०७ दिवसांच्या आंत करावा लागेल. तसेच सदर **कार्टेज** चे उधारीचे देयक म.जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांच्या नावाने सादर केल्यानंतर देयकाची रक्कम आपणास अदा करण्यात येईल.

६. सदर निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो.नंदुरबार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे. तसेच सदर पुरवठादार विक्रेत्याने केलेला पुरवठा समाधानकारक नसल्याची तक्रार संगणक विभागामार्फत प्राप्त झाल्यास दरपत्रक कुठल्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो.नंदुरबार यांचेकडून राखून ठेवण्यात येत आहे.

आदेशावरुन,

प्रबंधक 6/12/25

जिल्हा व सत्र न्यायालय, **नंदुरबार**

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार.

२. संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

यांना जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर/वेबसाईटर अपलोड करून प्रकाशित करणेसाठी